# मुलांसाठी बाइबल
## प्रस्तुत

# यशयाला भविष्य दिसते




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Mary-Anne S.



60 गोष्टींतील 27 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

यशया एक संदेष्टा होता. देवाने जे काही सांगितले असेल ते लोकांना कळविणे हे त्याचे काम होते.




1

लोकांना हमेशा देवाचे वचन ऐकायला आवडत नसे, परंतू यशयाने देवाला कधिच निराश केले नाही. चार वेगवेगळ्या राजांच्या कारकिर्दित यशयाने संदेश दिला.




2


यरुशलेम शहरातून उज्जीया राजा यहुदावर राज्य करित होता. सुरवातीला परमेश्वराने उज्जीया राजाला आशिर्वादित केले, कारण परमेश्वराच्या दृष्टिने जे चांगले ते तो करित होतो. परंतू उज्जीयाच्या मनात गर्व निर्माण झाला आणि त्याने परमेश्वराचे आज्ञापालन करणे सोडून दिले. यामुळे तो मरेपर्यंत कोडी बनून राहिला.
3


उज्जीया राजाने ६० वर्षे राज्य केले. त्याच्या मरणानंतर, त्याचा मुलगा योथान हा राजा झाला आणि त्याने सतरा वर्षे राज्य केले. परमेश्वराने योथामला आशिर्वादित केले कारण यशया संदेष्ट्याच्याव्द्वारे परमेश्वर जे काही सांगे ते तो करित असे.
4


योथाम राजाचा मुलगा आहाज होता. आहाज जेंव्हा राज्य करु लागला तेंव्हा तो विस वर्षाचा होता, आणि त्याने यरुशलेमेत सोळा वर्षे राज्य केले. आहाज राजाने परमेश्वराकडे लक्ष दिले नाही. तो मुर्ति व खोट्या देवांच्या भजनी लागला, आणि देवाच्या पुष्कळ लोकांना त्याने तसे करण्यास भाग पाडले. जरी यशयाने त्याला चेतावणी दिली होती तरी देखिल त्याने देवाच्या चेतावणीकडे लक्ष दिले नाही.
केवळ ३५ वर्षे आयुष्य असतांना तो मरण पावला.
5


देवाने त्याच्यानंतरचा राजा, हिज्कीया याला आशिर्वादित केले, कारण त्याने देशातून सर्व मुर्ति आणि खोटे देव काढून टाकले, आणि जिवंत व खऱ्या देवाची प्रार्थना केली. जेंव्हा शत्रू सैन्याने यहुदावर आक्रमण केले तेंव्हा त्यांच्याशी युध्द् करण्यास हिज्कीयाचे सैन्य पुरेसे सामर्थ्यशाली नाही हे तो जाणून होतो. देवाने मदत करावी यासाठी त्याने यशयाला देवाकडे प्रार्थना करण्यास सांगितले.
6


यशयाने राजाला हा संदेश पाठविला. "प्रभू परमेश्वर असे म्हणतोः या सैन्याला घाबरु नको... मी त्यांचे पारिपत्य करिन..." लवकरच, हिज्कीया संगती युध्द् न करताच परमेश्वराने त्यांना पळवून लावले.
7


यशयाच्या अवतीभोवती असणारे लोक जरी परमेश्वराविषयी जास्त विचार करीत नव्हते तरी यशया मात्र करित होता.
एके दिवशी, त्याला एक दृष्टांत प्राप्त झाला, दृष्टांत म्हणजे जणूकाय स्वप्न परंतू तेंव्हा तुम्ही झोपेत नसता, जागे असतात. या दृष्टांतात, आपला प्रभू परमेश्वर किती गौरवी आणि पवित्र आहे हे यशयाने पाहिले.
8


परमेश्वर देवाने दृष्टांतात विचारले, "मी कोणाला पाठवू?" यशयाने उत्तर दिले, "येथे मी आहे, मला पाठव." परमेश्वर जे काही सांगेल ते करण्यास आणि परमेश्वर जेथे कुठे पाठवेल तेथे जाण्यास तो तयार होता.
9


ज्या लोकांनी देवाचे वचन ऐकले नाही अशा दुरदेशी असणाऱ्या लोकांकडे परमेश्वर मला पाठविल असे कदाचित यशयाला वाटले असावे. परंतू नाही, परमेश्वराने तसे केले नाही.
10


त्याच्या स्वतःच्या देशातील, स्वतःच्या लोकांशी बोलावे असे परमेश्वराने यशयाला सांगितले. परमेश्वर त्यांच्या पापामुळे त्यांच्यावर रागावला आहे हे यशयाने त्यांना सांगायचे होते.
11


त्याच्या लोकांना सांगण्यासाठी अजून इतर गोष्टी देखिल यशयाकडे होत्या – कोणी एक जो सामर्थ्यशाली सोडवणारा बनेल आणि लोकांना त्यांच्या पापांपासून व शत्रूंपासून सोडविण्यासाठी येईल अशा व्यक्तिविषयी अद्‌भुत गोष्टी.
12


यहदी लोक या व्यक्तिला "मसिहा" असे म्हणत. देव मसिहा पाठवेल अशी ते अपेक्षा करित असतांना देखिल तो कधिच येणार नाही अशाप्रकारचे जीवन पुष्कळ लोक जगत होते.
13


यशयाने मसिहा विषयी सांगितलेल्या सर्व गोष्टी त्याच्या पुस्तकात लिहून ठेवण्यात आल्या आहे. त्या गोष्टी घडण्याच्या शेकडो वर्षे आधि जरी यशयाने या गोष्टी लिहिल्या असल्या, तरी यशयाने सांगितलेले सर्व काही सत्य होणार.
14

यशयाने सांगितले की, परमेश्वर देव स्वतः
चिन्ह देईल. तो म्हणाला, "पाहा,
कुमारी पुत्र प्रसवेल,



त्याला इम्मानुएल असे म्हणतील."
यशया देवाच्या मसिहा विषयी बोलत
आहे हे लोकांना कळत होते, कारण
कोणतीही स्त्री कुमारी असतांना
लेकराला जन्म देऊ
शकत नाही.



तसेच इम्मानुएल या
नावाचा अर्थ आम्हांबरोबर
देव असा आहे.

15



"आम्हांसाठी बाळ जन्मला आहे, आम्हांस
पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यावर सत्ता
राहिल; त्याला अद्‌भुत मंत्री, समर्थ देव,
सनातन पिता शांतीचा अधिपती
म्हणतील." देवाचे अभिवचन खरे ठरेल
याविषयी यशयाला पुर्ण खात्री होती,
घटना आधिच घडून गेली असल्यासारखे
बोलला. याला भाकित करणे किंवा
भविष्य करणे असे म्हणतात.

16

यशयाने सागितले की मसिहा महान होईल आणि महान कार्ये करिल. मसिहा
दुःख सहन करेल आणि मरण पत्करेल याविषयी देखिल यशयाने लोकांना
सांगावे असे देवाने त्याला सांगितले. मसिहा महान आणि सामर्थ्यशाली
असणार तसेच तो अशक्त आणि ठेचाळलेला असणार
हे असे कसे याविषयी यशयाला कदाचित नवल
वाटले असेल. परंतू यशयाने देवासंगती वाद
घातला नाही – देवाने जे काही सांगण्यास
त्याला सांगितले होते तेच त्याने
सांगितले. त्याचे भाकित खरे
ठरावे याची देव काळजी घेईल.



17

मसिहा येत होता – केवळ यहुदी लोकांसाठी नव्हे. मसिहा "परराष्ट्रीयांसाठी
प्रकाश" असा असेल असे परमेश्वराने यशयाला सांगितले. परराष्ट्रीय म्हणजे
जगातील असे सर्व लोक जे यहुदी नाहीत. परमेश्वर सर्वांवर प्रीति करतो आणि
त्याचा मसिहा सर्वांना आशिर्वाद देण्यासाठी आणि जगाच्या शेवटापर्यंत सर्वांचे
तारण करण्यासाठी येणार होता.



18

यशयाला भविष्य दिसते

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

यशया १, ६, ७, ९, ५३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत,
ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी
आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला
येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत
गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर
ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि
आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून
माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर,
जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी
कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी
जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!